**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २६ फेब्रुवारी २०२५**

**ठळक बातम्या**

- **महाशिवरात्रीच्या सणाचा राज्यात सर्वत्र उत्साह, विदर्भातील सर्वच शिवमंदिरांमधे भाविकांची गर्दी**
- **प्रयागराज इथल्या महाकुंभ मेळ्याचा आज समारोप, भंडाऱ्यातील नागरिकांनी देखील घेतली पवित्र स्नानाची अनुभूती**
- **ऊर्जा परिवर्तनासाठी महावितरणला सर्वोत्कृष्ट कामगिरीचा राष्ट्रीय पुरस्कार**
- **रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत विदर्भ आणि केरळ यांच्यात अंतिम सामना सुरु; दिवसा अखेर विदर्भाच्या** 4 **बाद** 254 **धावा**

महाशिवरात्री

महाशिवरात्रीचा सण आज देशभरात उत्साहात साजरा होत आहे.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाशिवरात्री निमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.राज्यासह विदर्भात देखील महाशिवरात्रीचा उत्साह आहे.भगवान महादेवाचे आशीर्वाद सर्व नागरिकांवर राहावेत आणि देश प्रगतीच्या मार्गावर पुढे जात रहावा, अशी कामना राष्ट्रपतींनी समाज माध्यमावर आपल्या संदेशात व्यक्त केली आहे. महाशिवरात्रीचा सण आत्मनिरीक्षण आणि आध्यात्मिक चेतनेचं प्रतीक असून लोकांना ज्ञान, संयम आणि करुणेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देत असल्याचं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. भगवान शंकराचा हा सण सर्व देशवासियांना समृद्धी आणि चांगले आरोग्य देईल, अशी शुभेच्छा प्रधानमंत्र्यांनी दिल्या आहेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी देखील महाशिवरात्रीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. नागपुरात महाशिवरात्रीच्या निमित्याने नागपूरच्या प्राचीन कल्यानेश्वर मंदीरात दर्शनासाठी करिता सकाळपासून भाविकाची गर्दी दिसून आली . महाशिवरात्री निमित्ताने नागपूरात विविध शिवालयांमध्ये

भाविकांनी मोठी गर्दी केल्याचे दिसत आहे. महाशिवरात्री निमित्य विधिवत पूजा अर्चना करून भगवान शिवचे रुद्राभिषेक करून पूजा केली जात आहे. विदर्भाची काशी म्हणून ओळख असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील श्री क्षेत्र मार्कंडादेव येथे महाशिवरात्रीच्या पर्वावर आज हजारो भाविकांनी 'हर हर महादेव' चा गजर करीत मार्कंडेश्वर येथे शिवलिंगाचे दर्शन घेऊन वैनगंगा नदीत स्नान केले. आज पहाटे आमदार डॉ. मिलिंद नरोटे आणि हरणघाट हनुमान मंदिराचे संत मुरलीधर महाराज यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. भाविकांच्या सुरक्षेसाठी एसडीआरएफचे ३० जवान ५ बोटींद्वारे गस्त घालत आहेत. आरमोरी तालुक्यातील वैरागड येथे नागरिकांनी भंडारेश्वर मंदिरात जाऊन पूजा-अर्चा केली. कुरखेडा तालुक्यातील अरततोंडी व खोब्रामेंढा तसेच चामोर्शी तालुक्यातील चपराळा येथेही भाविकांनी मनोभावे पूजा-अर्चा करुन शिवलिंगाचे दर्शन घेतले.सातपुडा पर्वत रांगेच्या पायथ्याशी असलेल्या छोटा महादेव म्हणून प्रसिद्ध असलेल्या तुमसर नजीक गायमुख तीर्थक्षेत्रात महाशिवरात्रि निमित्त असंख्य भाविक हजेरी लावत दर्शन घेत आहे

प्रयागराज

प्रयागराज इथं गेले सहा आठवडे सुरू असलेल्या सौहार्दाच्या महाकुंभमेळ्याचा आज समारोप होत आहे. तेरा जानेवारीला सुरू झालेल्या महाकुंभमेळा देशविदेशातून लाखो भाविकांनी पवित्र स्नानाचा अनुभव घेतला. आतापर्यंत ६४ कोटी ६० लाखांहून अधिक भाविकांनी संगमावर स्नान केलं आहे. दरम्यान जे लोक प्रयागराज या ठिकाणी गंगा स्नान करण्यासाठी जाऊ शकत नाही अशा भक्तांसाठी गोंदिया इथल्या शिवधाम या ठिकाणी आज शिवरात्रीनिमित्त प्रयागराज येथून त्रिवेणी संगमच्या नदीचे एक टँकर पाणी आणण्यात आले. आज महाशिवरात्री निमित्त भाविकांनी शिवधाम या ठिकाणी शंकराचे पिंडीचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांनी आले असता या भाविकांनी यावेळी प्रयागराज येथून आणण्यात आलेल्या संगमातील पाण्याने स्नान करण्याची संधी मिळाली. महाकुंभातील पवित्र स्नानाचे अनुभूती देणारे भंडारा शहरातील बहिरंगेश्वर मंदिर येथे माजी खासदार सुनील मेंढे यांच्या पुढाकारातून प्रयागराज कुंभमेळ्यातून पवित्र जल आणून टँकर च्या माध्यमातुन भक्तांवर शिंपडण्यात आले. या ठिकाणी पवित्र स्नान करण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.महाकुंभ

पर्वात देशाचे सांस्कृतिक बंध दृढ करण्यात प्रसारभारतीनं महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचं प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत सेहगल यांनी म्हटलं आहे. या पर्वाचे सर्व ४८ दिवस चाललेल्या कुंभवाणी वाहिनीमार्फत आकाशवाणीने करोडो लोकांशी संपर्क साधला, असं ते म्हणाले....

***इस विशेष चैनल ने अड़तालीस दिनों की एक छोटी सी यात्रा के दौरान बहुत लोगों को छुआ है। आकाशवाणी सभी से जुड़ा रहा है। आम आदमी से लेकर हमारे जो वहाँ महात्मागण थे, हमारे जो वहाँ अखाड़े आए हमारे यहाँ वहाँ जो संत जन आए उन सबसे आकाशवाणी जुड़ा रहा है।भारतीय संस्कृति को जन जन तक पहुंचाने में आकाशवाणी की एक भूमिका रही है।***

देशाची सार्वजनिक प्रसारण व्यवस्था म्हणून आकाशवाणीने या उत्सवात चोख कामगिरी बजावली असं प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी म्हणाले. कुंभवाणीमार्फत कमीतकमी वेळात अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्याच्या आकाशवाणीच्या कामगिरीबद्दल महासंचालक प्रज्ञा पालिवाल - गौर यांनी प्रशंसा केली.

वेव्ज

मुंबईत होऊ घातलेल्या वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिटमधे ट्रेलर मेकिंग स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. व्हिडिओ संपादन, चित्रपट निर्मिती याची आवड असणाऱ्यांसाठी ही स्पर्धा आहे. यात कमीत कमी अठरा वर्षं वयाचे स्पर्धक भाग घेऊ शकतात. ट्रेलर पाठवण्याची मुदत ३१ मार्च पर्यंत आहे. वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट मुंबईत १ ते ४ मे या कालावधीत होणार आह. जगभरातल्या माध्यम आणि मनोरंजन उद्योगाचं लक्ष भारताकडे वेधणं हे या समिटचं उद्दिष्ट आहे.

महावितरण

राज्यात अंमलात येणाऱ्या ऊर्जा परिवर्तन योजनेतील विशेष कार्यासाठी महावितरणला इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे नवी दिल्ली इथं काल आयोजित केलेल्या तेराव्या ग्रीन एनर्जी समिटमध्ये राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले.महावितरणला या प्रतिष्ठित परिषदेत 'स्टेट लेव्हल एक्सलन्स अॅवॉर्ड इन एनर्जी ट्रान्झिशन' या गटात पुरस्कार मिळाला. अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्या मार्गदर्शनात राज्याचा ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करण्यात आला आहे. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणकडून ऊर्जा परिवर्तन योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलिअन डॉलर्सची करण्यासाठी आगामी काळातील ऊर्जेची वाढती गरज ध्यानात घेऊन राज्याच्या ऊर्जा क्षमतेत पाच वर्षात ४५ हजार मेगावॅटने वाढ करण्यात येईल व ती ८१ हजार मेगावॅट होईल. ऊर्जा परिवर्तन योजनेनुसार महावितरणने नवीकरणीय ऊर्जेच्या वापरावर भर दिला आहे. तसेच महावितरणने उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना आज विदर्भ आणि केरळ संघांमध्ये नागपूरच्या जामठा येथील विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडिममधे होत असून आज सकाळी या सामन्याला सुरवात झाली. केरळच्या संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना विदर्भ संघाची सुरुवात अडखळत झाली. सलामीवीर पार्थ रेखाडे शून्यावर बाद झाला. त्यापाठोपाठ दर्शन नळकांडे एक धाव करून तर ध्रुव शोरे १६ धावा करून तंबूत परतला . पहिल्या दिवशीचा खेळ संपल्यानंतर विदर्भाच्या 4 बाद 254 धावा झाल्या होत्या. दानिश मालेवार 138 धावा काढून नाबाद आहे तर करून नायर यांनी 86 धावा काढल्या होत्या. केरळ संघाकडून एम.डी. निधीश याने 2 गडी बाद केले . या स्पर्धेत विदर्भानं सातपैकी ६ सामने जिंकून ४० गुणांची कमाई केली. तर केरळनं सातपैकी ३ सामने जिंकून २८ गुण कमावले आहेत.

रताळे लागवड

महाशिवरात्री ला उपवास करणाऱ्या भक्तांसाठी सर्वाधिक मागणी असते ती रताळ्याला.. यवतमाळच्या लाडखेडची रताळं विदर्भ मराठवाड्यात प्रसिद्ध असून. लाडखेड हे रताळं पिकविणारं गाव म्हणून ओळखले जाते. येथील शंभरावर शेतकरी दोनशे हेक्टरवर. या कालावधीत रताळ्यांना चांगला भावही मिळतो. त्यातल्या त्यात दरवर्षी पेक्षा यावर्षी रताळ्यांना तीनपट भाव जास्त मिळत असल्याने रताळे उत्पादक शेतकरी समाधान व्यक्त करीत आहेत.  दरम्यान रताळे लागवडीकडे एक जोडधंदा म्हणून बघण्याचं आवाहन  ज्योत्सना काजणे या महिला शेतकऱ्यांनी केले.

***आता माझे आहे पाच एकरच  रतनाळ तर दहा लाख रुपये आलेले आहेत आठ लाख रुपये उरलेले  आहे दोन लाख रुपये तुमचा  खर्च आलेला  आहे तर अस  मी सांगू शकते  की सर्व शेतकऱ्यांनी  जीवन न संपवता आपण निसर्गावरही निर्भर राहू नये  आणि आता जोडधंदा  ही आपली शेती वगैरे सर्व व्यवस्थित  पाहता  साडेतीन महिण्याच हे  पीक घेतल  तर तुम्हाला सरासरी  उत्पन्न चांगल  येऊ शकते***

तूर खरेदी

राज्यात तूर खरेदीची मुदत आणखी ३० दिवसांनी वाढवण्यात आली आहे. हमीभावाने तूर खरेदीसाठी २४ जानेवारी पासून पुढे ३० दिवसांपर्यंत शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणीबाबत कळवण्यात आलं होतं, आता ही मुदत आणखी ३० दिवस वाढवण्यात येत असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली. २४ फेब्रुवारी पर्यंत राज्यात २९ हजार २५४ शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे.

*****